www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

●LOKRAKSHANAY ●RNI.REG.NO. MAHBIL/2023/86118

●Executive editor- Aniket Ghanshyam Bhankal ●Daily ●Thane ●Volume-01, Issue-231 ● Tuesday, 30 January 2024 ●Pages-04 ●Rs.2/-

### अनमोल विचार

"वेळ आपला आहे हवे असल्यास सोनं करा आणि हवं असल्यास झोपेत घाला!!!"

## लक्षवेधी

### विधानसभेच्या येत्या अधिवेशनात समान नागरी कायद्यासाठी विधेयक सादर होणार

**नवी दिल्ली :** समान नागरी संहितेचे प्रारूप सिद्ध करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली समिती २ फेब्रुवारी या दिवशी राज्य सरकारला प्रारूप सादर करील आणि आम्ही आगामी विधानसभा अधिवेशनात विधेयक आणून राज्यात समान नागरी संहिता लागू करू, असे विधान राज्याचे मुख्यमंत्री पुष्कारसिंह धामी यांनी केले. मुख्यमंत्री धामी पुढे म्हणाले की, 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चे ध्येय आणि ठराव निवडणुकीपूर्वी राज्यातील जनतेसमोर ठेवण्यात आले होते. त्यांच्या संकल्प आणि आकांक्षा यांना अनुसरून आमचे सरकार राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहील. समान नागरी संहितेसाठी स्थापन करण्यात आलेल्या तज्ञ समितीचा कार्यकाळ चौथ्यांदा वाढवण्यात आला आहे.

### राजधानी दिल्लीत सर्वांना मोफत वीज मिळणार; केजरीवाल सरकारने आणली नवीन योजना

**नवी दिल्ली :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीकरांना मोठी भेट दिली आहे. केजरीवालांनी राजधानी दिल्लीत नवीन सौर ऊर्जा धोरण 2024 जारी केले आहे.या धोरणांतर्गत जे लोक त्यांच्या छतावर सौर पॅनेल बसवतील, त्यांना वीज बिल आकारले जाणार नाही. विशेष म्हणजे, याद्वारे ते दरमहा 700-900 रुपयेदेखील कमवू शकता. याबाबत केजरीवाल म्हणाले की, 'आतापर्यंत राजधानीत 2016 चे धोरण लागू होते. ते देशातील सर्वात प्रगतीशील धोरण होते. 200 युनिटपर्यंत वीज मोफत, 400 युनिटपर्यंत अर्धे बिल अन्त्याहून अधिक वापरावर पूर्ण बिल आकारले जाते. आता नवीन दिल्ली सौर धोरणांतर्गत पुढील 3 वर्षांत 500 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या सरकारी इमारतींवर सौर पॅनेल बसवणे बंधनकारक असेल.'

### श्रीराममंदिराच्या सुरक्षेसाठी ड्रोन विरोधी यंत्रणेचा वापर केला जाणार

**अयोध्या :** श्रीराममंदिराच्या सुरक्षेसाठी इस्त्रायलची ड्रोन विरोधी यंत्रणा वापरली जाणार आहे. उत्तरप्रदेश पोलीस इस्त्रायलकडून १० ड्रोन विरोधी यंत्रणा खरेदी करणार आहेत. त्याची खरेदी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे, अशी माहिती देण्यात आली आहे. अयोध्येसह मथुरा, वाराणसी, लक्ष्मणपुरी यांसारख्या अतीसंवेदनशील ठिकाणी ही यंत्रणा बसवली जाणार आहे. श्रीराममंदिराच्या उद्घाटनाच्या दिवशी ड्रोन विरोधी यंत्रणेचा वापर करण्यात आला होता. उत्तरप्रदेश पोलिसांनी ही यंत्रणा राष्ट्रीय सुरक्षा दल आणि विशेष संरक्षण गट यांच्याकडून तात्पुरत्या वापरासाठी घेतली होती; मात्र आता उत्तरप्रदेश पोलिसांनी ही यंत्रणा खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे.

### ज्ञानवापी मशिदीच्या टाळे ठोकलेल्या भागात भारतीय पुरातत्व विभागाकडून सर्वेक्षण व्हावे !

**नवी दिल्ली :** ज्ञानवापी प्रकरणात हिंदु पक्षाने सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रविष्ट (दाखल) केली आहे. न्यायालयाने १९ मे २०२३ या दिवशी ज्ञानवापी मशिदीतील शिवलिंग सापडलेल्या परिसरामधील जागेच्या वैज्ञानिक सर्वेक्षणावर बंदी घातली होती. हिंदु पक्षाचे अधिवक्ता विष्णु शंकर जैन यांनी प्रविष्ट केलेल्या याचिकेतून ही बंदी उठवण्यात यावी, तसेच भारतीय पुरातत्व विभागाच्या महासंचालकांना या जागेचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे. या माध्यमातून सीलबंद भागात असलेल्या शिवलिंगाचे स्वरूप आणि त्याच्याशी निगडित इतर वस्तूस्थिती कोणतीही हानी न होता तपासता येईल. या याचिकेत 'आवारात बांधण्यात आलेल्या नवीन भिंती, तसेच छत हटवूनच सर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याखेरीज इतर टाळे ठोकलेल्या ठिकाणीही उत्खनन आणि इतर शास्त्रोक्त पद्धतीने सर्वेक्षण करून त्याचा अहवाल न्यायालयाला देण्यात यावा', अशी मागणी करण्यात आली आहे.

### भागवत सांप्रदायात संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे - सूर्यकांत भिसे

**भोपाळ :** भागवत सांप्रदायात संत ज्ञानेश्वर व संत नामदेव महाराज यांचे स्थान महत्त्वपूर्ण असून यांनी महाराष्ट्रासह उत्तर भारतात भागवत धर्माचा प्रचार व प्रसार केला, असे मत भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी व्यक्त केले. मध्य प्रदेश सरकारच्या जनजातीय लोककला एवं बोली विकास अकादमी संस्कृती परिषदेच्या वतीने भोपाळ येथील रवींद्र भवनमध्ये 'सांस्कृतिक परंपरेत साधू व सन्यासी' या विषयावर तीनदिवसीय शोध संगोष्टीचे आयोजन करण्यात आले आहे. या संगोष्टीचे उद्घाटन अयोध्याचे आचार्य मिथिलेशनंदन शरण यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. मनोज श्रीवास्तव हे होते. प्रास्ताविकात या संस्कृती परिषदेचे संचालक डॉ. धर्मेंद्र पारे यांनी शोध संगोष्टीच्या आयोजनाची माहिती देवून भारतीय साधू, संत, संन्यासी यांनी भारतीय संस्कृती व परंपरा पुढे नेण्याचे व त्यास दिशा देण्याचे काम केल्याचे सांगितले.

### निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर म्हणाले,'विधानसभा निवडणुकीपर्यंत...'

**नवी दिल्ली :** बिहारमधील सत्तापरिवर्तनावर धारदार भाष्य करताना, निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांना 'पलटुमार' म्हटले आहे आणि म्हटले आहे की फ्लिप फ्लॉप त्यांच्या राजकारणाचा एक भाग बनला आहे. भाजपवर टीका करताना प्रशांत म्हणाले, जे काही दिवसांपूर्वी नितीश कुमार यांच्यावर टीका करत होते ते आता त्यांचे स्वागत करत आहेत. निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर म्हणाले, मी सुरुवातीपासून म्हणत आलो आहे की नितीश कुमार कधीही बाजू बदलू शकतात. हा त्यांच्या राजकारणाचा एक भाग झाला आहे. भाजप काही महिन्यांपूर्वी नितीशकुमारांसाठी आपले दरवाजे बंद असल्याचे सांगत होता. भाजपचे नेते काल नितीशकुमारांना शाब्दिक शिव्या देत होते, आता सुशासनाचे प्रतीक म्हणून त्यांचा गौरव केला जाईल. जो राजद त्यांना भविष्याचा नेता म्हणत होता, त्याला आज बिहारमध्ये भ्रष्टाचार दिसेल. नितीशकुमार हे पलटुमार आहेत हे जगाला माहीत आहे आणि हा आता चर्चेचा विषय राहिलेला नाही.

# नमो महारोजगार मेळावे यशस्वी करण्यासाठी समन्वयाने प्रयत्न व्हावेत -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे






**■ठाणे। यश सावंत,**

तरूणांसाठी रोजगार हा जिव्हाळ्याचा विषय आहे. एका तरुणाला रोजगार म्हणजे, त्याच्या कुटुंबांचा आनंद, समाधान. त्यामुळे नमो रोजगार अभियानांतर्गत होणारा नमो महारोजगार मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्वच विभागांनी मेहनत घ्यावी. त्यासाठी मुख्यमंत्री सचिवालयातूनच संनियंत्रण केले जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले. शासन आपल्या दारी प्रमाणेच नमो महारोजगार मेळावे यशस्वी करण्यासाठी प्रयत्न व्हावेत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. नमो महारोजगार अभियानांतर्गत ठाणे जिल्हयात आयोजित करण्यात येणाऱ्या महारोजगार मेळव्याच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठक झाली. या बैठकीस कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार मनोज सौनिक, कौशल्य विकास व उद्योजकता विकास विभागाचेअ अतिरिक्त मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, कौशल्य विकास आयुक्त निधी चौधरी आदी उपस्थित होते. एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आदी दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले, शासन आपल्या दारी हे अभियान यशस्वी झाले आहे. त्याचप्रमाणे नमो महारोजगार अभियानांतर्गत नागपूर येथील महारोजगार मेळावा यशस्वी झाला आहे. त्याचप्रमाणे आता यापुढे होणारे महारोजगार मेळावे शासनाच्या सर्व विभागांनी एकत्र येऊन, मेहनत घेऊन यशस्वी करणे आवश्यक आहे. एका तरूणाला रोजगार मिळाला, तर त्याच्या कुटुंबांलाही मोठा दिलासा मिळतो. त्यामुळेच या महारोजगार मेळाव्यात जास्तीत कंपन्यांनी यावे यासाठी प्रयत्न व्हावेत. या मेळाव्यात सहभागी तरुणांचीही कुशल, निमकुशल अशी वर्गवारीची माहितीही उपलब्ध करून देण्यात यावी. मोठ्या कंपन्यांसोबत, आपले महानगरपालिका, बांधकाम क्षेत्रातील कंपन्या, त्यांच्या संघटना, तसेच मोठे उद्योग नोकऱ्यांचे ऑनलाईन प्लॅटफार्मस, रिक्रुटमेंट कंपन्यांही यावेत, असे नियोजन करण्यात यावे.

## पालिका कर्मचाऱ्यांना प्रतिक्षा वाढीव वेतनाची

**■मुंबई। सचिन कदम,**



सहाव्या वेतन आयोगाने शिफारस केलेले वेतन निश्चित करण्यासाठी वेतन विसंगती सुधारणा समितीने दिलेला अहवाल मागील वर्षी तयार झाला. त्यानंतर परिपत्रकही निघाले.मात्र वाढीव वेतन कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाही. निर्णयाची अंमलबजावणी महापालिकेने केलेली नाही. त्यामुळे पालिकेचे हजारो कर्मचारी कर्मचारी वाढीव वेतनापासून वंचित राहत आहेत. वेतन विसंगती सुधारणा समिती अहवालाच्या आधारे उप प्रमुख लेखापालांनी २३ ऑक्टोबर २०२३ मध्ये परिपत्रक जारी केले. या परिपत्रकानुसार नोव्हेंबर २३ पासून वेतनात वाढीव रकमेचा समावेश होणे अपेक्षित होते. मात्र डिसेंबर २०२३ च्या वेतनातही वाढीव रक्कम जमा झालेली नाही. पालिका प्रशासनाने यापूर्वीची थकबाकीची रक्कम पुढील तीन वर्षात म्हणजे २०२४ ते २०२६ या वर्षात तीन टप्प्यात द्यायची आहे. मात्र वाढीव रक्कम न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. सर्व विभागांच्या आस्थापनांनी वेतन निश्चिती करून ठेवली असली तरी लेखापाल विभागाकडून आदेश जारी केले जात नाहीत, वरिष्ठांकडून अद्याप आदेश आले नसल्याचे सांगण्यात येते, असे दि म्युनिसिपल युनियनचे रमाकांत बने म्हणाले. वाढीव वेतनाच्या मुद्द्यावर पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी आणि सह आयुक्त मिलिन सावंत यांच्यासोबत १२ जानेवारी २०२४ रोजी बैठक झाली. त्यात प्रमुख लेखापाल खात्याकडून परिपत्रकाची अंमलबजावणी होत नसल्याची बाब निदर्शनास आणून नाराजी व्यक्त केली. यावेळी अतिरिक्त आयुक्तांनी तत्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले. मात्र, लेखापाल वरिष्ठांकडून आदेश नसल्याचे सांगत टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे आता प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर शंका येते आहे, असे बने म्हणाले.

## लोकशाही संपवण्याच्या दिशेने टाकलेले पुढचे पाऊल मानायचे का? ; उद्धव ठाकरेंचा सवाल

**■मुंबई। अनिकेत भंकाळ,**



देशाच्या पक्षांतर बंदी कायदा समितीच्या अध्यक्षपदी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांची नेमणूक करण्यावरून विरोधकांनी सत्ताधारी भाजपावर निशाणा साधला आहे. नार्वेकरांची निवड हे देशातील लोकशाही संपवण्याच्या दिशेने टाकलेले पुढचे पाऊल मानायचे का? असा सवाल माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विचारला आहे. उद्धव ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्रात नुकताच परिशिष्ट दहाच्या चिंधड्या उडवून जो उफराटा निर्णय नार्वेकरांनी दिला त्याचे वस्त्रहरण आम्ही जनतेच्या न्यायालयात तर केलेच, परंतु त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयातही गेलो आहोत. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात असताना ही नेमणूक करणे म्हणजे सर्वोच्च न्यायालयावर दडपण आणण्याचाच प्रयत्न समजावा लागेल असं ठाकरेंनी म्हटलं.

त्याशिवाय आम्ही सर्वोच्च न्यायालयाहून मोठे आहोत, आम्ही म्हणू तेच संविधान आणि म्हणू तोच कायदा यापुढे देशात असेल असे म्हणणारे कोणीही असले तरी त्याला डॉक्टर बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाची आणि लोकशाहीची ताकद दाखवावीच लागेल. अन्यथा देशात लोकशाहीची हत्या होऊन बेबंदशाही येईल असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी दिला आहे.

काय आहे प्रकरण?

राज्य विधिमंडळात रविवारी ८४ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी व ६० व्या सचिव परिषदचा समारोप झाला. यावेळी पक्षांतर बंदी कायद्यातच सुधारणा करण्याचा विचार पुढे आला असून यासाठी संशोधन समिती नेमण्यात आली आहे.

## मराठा समाजाचे सर्वेक्षण करणाऱ्या प्रगणकाला सहकार्य करण्याचे आवाहन

**■मुंबइे। नितीन देवळेकर,**

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण तपासण्यासाठी २३ जानेवारी पासून सर्वेक्षण करण्यात येत आहे. हे सर्वेक्षण ३१ जानेवारी २०२४ पर्यत करण्यात येणार आहे. सर्वेक्षणाचा कालावधी कमी असल्याने प्रगणक सकाळी लवकर अथवा सायंकाळी उशिरा सर्वेक्षणासाठी येऊ शकतात. तरी नागरिकांनी त्यांना आवश्यक माहिती देऊन सर्वेक्षणास सहकार्य करावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत करण्यात येत आहे.

सर्वेक्षणासाठी नियुक्त केलेले अधिकारी आणि कर्मचारी घरोघरी जाऊन कुटुंबाची माहिती घेत आहेत. नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आयोगामार्फत सर्वेक्षणासाठी ओळखपत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सर्वेक्षणादरम्यान केवळ मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील कुटुंबाची माहिती प्रश्नावलीद्वारे भरून घेण्यात येत आहे. कुटुंब आरक्षित प्रवर्गातील असल्याची माहिती प्रगणकाला मिळाल्यानंतर त्या कुटुंबाची पुढील माहिती घेतली जाणार नाही, अशी माहिती आयोगामार्फत प्रसिद्धी पत्रकान्वये कळविली आहे.

## कोकणातील हापूस आंबा नवी मुंबईतील एपीएमसीत दाखल



**■रत्नागिरी। दिगंबर जाधव,**

कोकणातील हापूस आंब्याची जानेवारी महिन्यात विक्रमी आवक झाली आहे. दरवर्षी जानेवारी महिन्यांत हापूसच्या फक्त 25 ते 30 येत होत्या. मात्र यंदा 360 पेट्या मार्केटमध्ये दाखल झाल्यात.. तसंच प्रत्येक पेट्यांना 7 ते 12 हजारांचा दर या आंब्यांना मिळू लागलाय. आंबा पिकायला आणि बाजारपेठेत विक्रीसाठी येण्याला एप्रिल महिना उजाडतो.

कोकणातील शेतकरी आता हापूस आंब्याचे पिक लवकर घेवू लागल्याने एपीएमसीत आंबा वेळेच्या आधी येत आहे. आता आलेला हापूस आंब्याचा मोहोर हा गेल्या वर्षीच्या ऑक्टोबर महिन्यातील आहे. डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात आलेला मोहोर हा आवकाळी पावूस , थ्रीप्स रोगामुळे गळाल्याने एप्रिल महिन्यात हापूस आंब्याचे उत्पन्न कमी होणार आहे. सध्या येत असलेल्या मोहोरवर कोणती बाधा न आल्यास मे महिन्यात चांगली आवक एपीएमसीत दाखल होवू शकते

फळांचा राजा अशी ओळख असलेला आंबा हा बाजारात कधी दाखल होणार याची उत्सुकता सर्वांनाच असते.लोक वर्षभर आंब्याची वाट पाहत असतात. कोकणातील हापूसला पुणे, मुंबई प्रमाणे विदेशात चांगली मागणी आहे. कोकणातून मोठ्या प्रमाणावर हापूसची निर्यात होत असते.

## 'परदेशस्थ मराठी नागरिकांसाठी विधानभवनात 'स्नेहकक्ष' उभारणार', नीलम गोऱ्हे यांची घोषणा



**■मुंबई। भावना जैन,**

महाराष्ट्रात व्यवसायाकरिता ज्या परदेशस्थ मराठी माणसांचे राज्य सरकारसोबत सामंजस्य करार झाले आहेत त्याचा शासनस्तरावर पाठपुरावा करण्यासाठी प्रयत्न केले जातील. यासोबतच त्यांच्या विविध समस्यांचे निराकरण होण्यासाठी विधानभवनातील उपसभापती कार्यालयात आठवड्याच्या प्रत्येक मंगळवार व बुधवारी दुपारी ४ ते ८ या वेळेत भेटणार असून याकरिता 'स्नेहकक्ष' उभारण्यात येणार असल्याचे विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. नवी मुंबई येथील सिडको येथे सुरू असलेल्या विश्व मराठी संमेलन-२०२४ कार्यक्रमास शनिवार दिनांक २७जानेवारी २०२४रोजी महाराष्ट्र विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी भेट दिली. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी मराठी भाषा व शालेय शिक्षण तथा मुंबई (शहर) पालकमंत्री दीपक केसरकर उपस्थित होते.

यावेळी उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, ज्यावेळी पहिल्यांदा पानिपत येथे स्मारकाला भेट दिली त्यावेळी समजले की, आजूबाजूच्या पाच जिल्ह्यांमध्ये मराठी लोकांचे वास्तव्य आहे. देशातील, परदेशातील मराठी माणूस एकत्रित आला पाहिजे. परदेशातील मराठी लोकांना अनेक सांस्कृतिक प्रश्न उद्भवत असतात त्यावर उपाययोजना व एकमेकांना मदत करण्याच्या दृष्टीने मराठी मंडळांसारखी व्यासपीठे असावीत.

## न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी संस्थात्मक तरतुदी अपुऱ्या ! - सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड

**■नवी दिल्ली। प्रगती शर्मा**



भारताच्या राज्यघटनेमध्ये न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यासाठी अनेक संस्थात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ न्यायाधिशांच्या निवृत्तीचे निश्चित वय, न्यायाधिशांच्या निवृत्तीनंतर त्यांच्या वेतनात पालट न करण्याचे बंधन इत्यादी.

असे असले, तरी न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी या संस्थात्मक तरतुदी अर्पुया पडत आहेत, असे मत सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी व्यक्त केले आहे. सर्वोच्च न्यायालयाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड पुढे म्हणाले की, मुक्त न्यायव्यवस्था म्हणजे अशी न्यायव्यवस्था ज्या व्यवस्थेत न्यायाधीशही मानवी पक्षपातांपासून मुक्त असतील. गेल्या काही काळात यासंदर्भात अनेक वाद उद्भवले आहेत. त्यांचे स्वरूप कमालीचे क्लिष्ट आहे. या वादांचे निराकरण सध्याच्या चौकटीत अवघड होत आहे; पण हे सर्व असले, तरी सर्वोच्च न्यायालय राज्यघटनेचे संरक्षण आणि कायद्याचे राज्य कायम राखण्याचे आपले मूलभूत कर्तव्य कधीच विसरू शकत नाही. सातत्याने वाढत्या खटल्यांवर तोडगा काढण्यात वर्षागणिक सर्वोच्च न्यायालयाला अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## '...तर शेतमालाला रास्त भाव मिळेल, शेतीला उद्योग म्हणून पाहायला हवे': धनंजय मुंडे'



**■पुणे। अभिजित येरल्लू**

शेतकऱ्यांनी शेती विषयक विचार बदलले पाहिजेत, शेतीला एक उद्योग म्हणून पाहिले पाहिजे. त्यादृष्टीने शेती केली पाहिजे तरच शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न सुटू शकतील, असे प्रतिपादन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. शेतकरी कंपनीचा शेतमाल आता अमेझॉन , फ्लिपकार्ट, हिंदुस्तान युनीलिव्हर, टाटा यांसारख्या मोठ्या बाजारपेठेत थेट जाणार असल्याचे सांगितले जात आहे.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA), कृषी विभाग, मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प आणि ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कृषी मूल्य साखळी भागीदारी बैठक -२०२४ सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते. स्मार्ट प्रकल्प अंतर्गत सहभागी शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कृषी उत्पादनास बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय व देशातील महत्त्वपूर्ण कंपन्यां सोबत करार करण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला रास्त भाव मिळेल.

कृषी विभागामार्फत कृषी उत्पादनांची मूल्य साखळी निर्माण करण्यासाठी कंपनी व शेतकरी उत्पादक कंपन्यांना सर्व मदत देण्यात येईल. प्रधानमंत्री यांनी देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामध्ये महाराष्ट्राचा हिस्सा एक ट्रिलियन राहणार आहे. कृषी आणि संलग्न क्षेत्राचा वाटा सात टक्के आहे, तो आता सोळा टक्के करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

## राष्ट्रवादीच्या आमदार अपात्रता प्रकरणावर 15 फेब्रुवारीपर्यंत निकाल देणार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांची माहिती



**■मुंबई। विशाल कारंडे,**

राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरणावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कोर्टात सुनावणी सुरु आहे. यावर प्रतिक्रिया देताना राहुल नार्वेकरांनी म्हटलं की, मंगळवारी आणि बुधवारी या प्रकरणावर अंतिम सुनावणी घेण्यात येईल 31 तारखेला हे प्रकरण क्लोज फॉर ऑर्डर करण्यात येईल. त्यामुळे 15 फेब्रुवारीपर्यंत राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरणावर अंतिम निकाल देण्यात येणार असल्याचंही विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटलं आहे. राष्ट्रवादीच्या आमदार अपात्रता प्रकरणावर निकाल देण्यास 15 दिवसांचा कालावधी वाढवून देण्यात आलाय. त्यामुळे शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणानंतर लवकरच राष्ट्रवादीच्या आमदार अपात्रतेच्या प्रकरणावर देखील येत्या काही दिवसांत निकाल लागेल. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंड झाल्यानंतर अजित पवारांकडून पक्ष आणि चिन्हावर देखील दावा करण्यात आला.

तसेच या आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात देखील सुनावणी सुरु आहे. ठाकरे, आव्हाडांनी नियमाला धरुन बोलावं - राहुल नार्वेकर शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर राहुल नार्वेकर यांनी दिलेला निकाल हा थेट अमान्य करत विरोधकांनी टीका केली.

# पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पालघर पोलीस स्टेशनमधून आरोपी फरार



■पालघर। प्रतिनिधी,

मुंबई बडोदा द्रुतगती मार्गाच्या जमीन अधिग्रहण प्रकरणात बनावट कागदपत्रांचा आधार घेऊन जमिनीचा मोबदला मिळवल्या प्रकरणात अटकेत असणारा राहुल सोनार (३२) या आरोपीने आज सायंकाळी पालघर पोलीस स्टेशनमध्ये पोलिसांना गाफील ठेवून पलायन केले. पोलिसांना ही बाब समजल्यानंतर पळालेल्या आरोपीचा सर्वत्र शोध सुरू करण्यात आला आहे. जमीन अधिग्रहण प्रकरणात बनावट ओळखपत्र, आधार कार्ड यांचा वापर करून बँकेत जमा झालेली रक्कम हडप केल्या प्रकरणात पालघर पोलिसांमध्ये सहा महिन्यांपूर्वी गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात राहुल सोनार याला पालघर पोलिसांनी अटक केली होती.

वैद्यकीय तपासणीनंतर लघुशंकाला जातो अशी सबब पुढे करून आरोपी ठाणे अंमलदार यांच्या कक्षामध्ये काही काळ बसून राहिला होता. दरम्यान पालघर येथे जनसंवाद अभियान अंतर्गत बक्षीस वितरण सोहळा पालकमंत्री यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू असल्याने वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी त्या ठिकाणी कार्यरत होते.

याचवेळी पोलीस स्टेशन मधील पोलीस कर्मचारी अन्य एका आरोपीला कोठडीमध्ये रवानगी करत असताना राहुल सोनार हा पोलिसांच्या हातावर तुरी देऊन अलगदपणे निसटला. ही बाब सुमारे ५-१० मिनिटांनंतर पोलिसांच्या निदर्शनास आल्यानंतर पोलीस स्टेशन मधील कर्मचारी उपलब्ध असणाऱ्या वाहनांच्या मदतीने शोध कार्यासाठी रवाना झाले. यापूर्वी देखील पोलीस स्टेशन मधील छतामध्ये छिद्र पाडून काही वर्षापूर्वी आरोपी फरार झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणात फरार झालेल्या आरोपीचा शोध पालघर पोलीस घेत आहेत.

# नवी मुंबई महापालिकेच्या सर्व विभाग कार्यालयातील इंटरनेट सेवा ठप्प



■नवी मुंबई। प्रतिनिधी,

नवी मुंबई मनपा पेपरलेस कामकाजावर भर देत असते. त्यामुळे सर्वच विभाग कार्यालय इंटरनेट सेवा आहे. खासकरून नवी मुंबईकरांशी संबंधित जसे विविध देयके जमा करणे, इ सेवाद्वारे आलेल्या तक्रारी पाहणे पाठपुरावा करणे, आदी. त्याचबरोबर दैनंदिन नोंदीची अन्यत्र मनपा कार्यालय मुख्यालय यांच्यातील दैनंदिन संवादासाठी इंटरनेट सेवा अत्यंत महत्वाची बजावते. मात्र आठवड्याच्या पहिल्याच दिवशी अर्थात सोमवारी इंटरनेट सेवा बंद होती. इतरत्र पाहणी केली असता सर्वच म्हणजे आठही विभाग कार्यालयांत इंटरनेट सेवा ठप्प असल्याचे समोर आले. इंटरनेट शुल्क दिले नसल्याने ही सेवा बंद करण्यात आल्याची चर्चा पालिका वतुर्ळात होत आहे. सलग तीन दिवस सुट्ट्या असल्याने कामकाज बंद होते. चौथ्या दिवशी इंटरनेटमुळे कामकाजावर परिणाम झाला आहे. सुट्ट्या असल्याने सेवा कधी बंद झाली हे सांगता येत नसल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले. याबाबत विद्युत विभाग मुख्य अधिकारी प्रवीण गाढे यांना विचारणा केली असता इंटरनेट सेवा ठप्प झाल्याच्या प्रकाराला त्यांनी दुजोरा दिला व त्याचे कारण शोधून लवकरात लवकर सुरू केले जाईल, असे सांगितले.

# द्रोणागिरी, तळोजामध्ये सिडकोचे २२ ते ३४ लाखात घर प्रजासत्ताक दिनी ३३२२ सदनिकांच्या सोडतीची योजना जाहीर



■पनवेल। प्रतिनिधी,

मुंबई आणि नवी मुंबई या दोन शहरांना जोडणाऱ्या अटलसेतूमुळे द्रोणागिरीचे महत्व वाढले आहे. सिडको महामंडळाने प्रजासत्ताक दिनी आधुनिक आणि नियोजित वसाहतींमध्ये घर खरेदी करण्याची संधी सर्वसामान्यांना दिली आहे. सिडको महामंडळाने द्रोणागिरी आणि तळोजा या परिसरातील ३३२२ सदनिकांची सोडतीची घोषणा केली असून ३० जानेवारी ते २७ मार्च या दरम्यान इच्छुकांना ऑनलाईन पद्धतीने या सोडतीमध्ये अर्ज करता येईल. या सोडतीमध्ये द्रोणागिरी सेक्टर ११ व १२ या परिसरात २२ लाख ते ३० लाख रुपयांमध्ये लाभार्थ्यांना सदनिका घेण्याची संधी मिळाली आहे. आर्थिक दुर्बल घटकासाठी २५.८१ चौरस मीटरची सदनिका २२ लाख १८ हजार रुपयांमध्ये तसेच २९.८२ चौरस मीटरची सदनिका सर्वसाधारण प्रवर्गामधील लाभार्थ्यांना ३० लाख १७ हजारांना मिळणार आहे. तसेच तळोजा नोडमधील सेक्टर २१, २२, २७, ३४, ३६, ३७ या परिसरातील सदनिकांचा समावेश आहे. या सदनिका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव आहेत. २२ लाख ते ३४ लाख रुपयांमध्ये या सदनिका सोडतीमध्ये लाभार्थ्यांना मिळू शकणार आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थी उमेदवारांना केंद्र शासनाचे दीड लाख आणि राज्य शासनाचे एक लाख असे अनुदान संबंधित सोडतीच्या योजनेत मिळणार आहेत.

# उल्हासनगरातील रस्ते दुभाजक व भिंतींना रंगरंगोटी; चौकाचेही सुशोभीकरण व वृक्षारोपण

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

शहराचे रुपडे बदलण्यासाठी रस्ते दुभाजकांची रंगरंगोटी, भिंतीवर पर्यावरण विषयक चित्रे, चौकाचे सुशोभीकरण आदी कामे महापालिकेने सुरू केल्याची माहिती उद्यान अधीक्षक दीप्ती पवार यांनी दिली. महापालिकेच्या या आगळीवेगळ्या उपक्रमाने शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. उल्हासनगरात हजारो कोटीच्या निधीतून विविध विकास कामे सुरू असून शिवसेना शिंदे गट व भाजपच्या नेत्याच्या टेंडर घोटाळ्याच्या आरोप प्रत्यारोपावरून शहरातील वातावरण ढवळून निघाले आहे. तर दुसरीकडे शहर सौंदर्यात भर घालण्यासाठी महापालिका आगळावेगळा उपक्रम राबवित आहे. शहरातील रस्ते दुभाजकांची रंगरंगोटी करण्यात येत असून दुभाजकां मध्ये विविध जातीचे रंगेबेरंगी फुलांचे व शोभेचे



झाडे लावण्यात येत आहे. रस्ते बाजूच्या भिंती पर्यावरणपूरक चित्रांनी रंगवीत असून चौकाचे सुशोभीकरण करण्यात आले. या कामामुळे रस्ते व चौक उजळून निघाले असून शहरातील भिंतींवर विविध सामाजिक पर्यावरण पूरक तसेच शहरात वाचन संस्कृतीची जपणूक व्हावी. याकरिता संतांच्या कविता भिंतीवर साकारण्यात आल्या आहेत. आदी अनेक उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती शहर अभियंता संदीप जाधव व उद्यान अधिक्षक दिप्ती पवार यांनी दिली.

महापालिकेने शहर सौंदर्यात भर घालण्यासाठी इमारत सोसायटींच्या भिंती, सरकारी इमारतींच्या भिंती, पाण्याच्या मोठ्या टाक्या आदिवर आकर्षक चित्रे काढण्यात येत आहे. तसेच शाळा, महाविद्यालये याबाहेरील भिंतीवर शिक्षणाशी संबंधित विषय, उद्यानाबाहेरील भिंतीवर खेळ आणि पर्यावरण संवर्धनाचे संदेश देणारे चित्र, रुग्णालयबाहेरील भिंतीवर स्वच्छता व आरोग्य सेवा यासंबंधीची जाणीव करुन देणारी चित्रे काढण्यात आली आहे. असे विविध उपक्रम राबवून शहर कसे सुंदर दिसेल. यातून प्रयत्न करीत असल्याची माहिती पवार यांनी दिली. या आगळ्यावेगळ्या उपक्रमातून शहरातील नागरिकांमधे शहराविषयी सकारात्मकता भावना निर्माण होईल. असेही त्यांचे म्हणणे आहे.

# एसटीच्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे निषेध आंदोलन



■ठाणे। प्रतिनिधी,

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सोमवारी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी ठाण्यातील वंदना बस डेपो जवळ निषेध आंदोलन केले. राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस सदानंद विचारे यांच्या नेतृत्वाखाली ठाणे, मुंबई,पालघर, नाशिक येथील सेवानिवृत्त कर्मचारी निदर्शने करणार आहेत. उर्वरित महाराष्ट्रातील सेवानिवृत्त कर्मचारी हे त्या - त्या विभागातील विभाग नियंत्रक कार्यालयासमोर निदर्शने करणार आहेत. २०१७ पासुन जवळपास ३२ हजारांहून अधिक सेवानिवृत्तांची पेन्शन एसटी महामंडळाने प्रशासकीय शुल्क न भरल्या मुळे अद्याप सुरू झालेली नाही ती तात्काळ सुरु करण्यात यावी. भारत सरकारच्या नवीन पेन्शन योजनेचा लाभ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मिळण्यात एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे विलंब होत आहे.

सेवानिवृत्त कर्मचारी पती, पत्नी यांना फक्त सहा महिन्यांचा एसटीचा मोफत पास मिळतो तो पुर्ण वर्षाचा मिळावा व तो एसटीच्या सर्व प्रकारच्या गाड्यांमध्ये चालावा तसेच कर्मचारी मृत पावल्यास त्याच्या पत्नीला पुढे हा मोफत पास ती हयात असे पर्यंत सुरू रहावा. कामगार करारातील तरतुदीनुसार सेवानिवृत्तांचीसाठी दवाखान्याची सोय करणे, सेवनिवृतांच्या मुलांना नोकरीत ५ टक्के आरक्षण मिळावे तसेच वैद्यकीय बिलांची परिपुर्ती तात्काळ करण्यात यावी या महत्वपूर्ण मागण्यांसह अजुन अनेक छोट्या मोठ्या मागण्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी केलेल्या आहेत.

# दोन लाख घरांचे सर्वेक्षण पूर्ण ; तीन दिवसांच्या सुट्टीतही ठाणे पालिका 'ऑन ड्युटी'

■ठाणे। प्रतिनिधी,

महाराष्ट्रातील मराठा समाजाचे मागासलेपण तपासणीचे काम राज्य सरकारतर्फे राज्य मागासवर्ग आयोगाकडे सोपविण्यात आले आहे. त्यानुसार राज्यातील सर्व ग्रामीण, शहरी भागातील मराठा समाज व खुल्या समाजातील नागरिकांचे सर्वेक्षण २३ ते ३१ जानेवारीदरम्यान केले जाणार आहे. ठाण्यामध्ये सुरू असलेल्या या सर्वेक्षणाची जबाबदारी ठाणे पालिकेच्या कर्मचाऱ्यांवर असून आतापर्यंत दोन लाख घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. तीन दिवस जोडून आलेल्या सुट्टीच्या काळातही पालिकेचे अधिकारी-कर्मचारी 'ऑन ड्युटी' होते. त्यामुळे या काळात शहरात विविध प्रभाग समित्यांच्या अंतर्गत पालिका कर्मचाऱ्यांनी सर्वेक्षण मोहीम पूर्ण केली आहे.



मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविण्याच्या दिशेने राज्य सरकारने शनिवारी महत्त्वाचे पाऊल टाकत मराठा समाजाच्या मागण्या मान्य करणाऱ्या अधिसूचनेची प्रत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांना दिली. या आधीपासूनच राज्य मागासवर्ग आयोगाने दिलेल्या सॉफ्टवेअर ॲप्लिकेशनद्वारे ठाण्यात सर्वेक्षण सुरू केले होते. त्यासाठी ठाणे पालिकेच्या माध्यमातून २५० पर्यवेक्षक व सुमारे ४००० प्रगणक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित प्रभाग समितीचे सहायक आयुक्त हे वॉर्डस्तरीय नोडल ऑफिसर व कार्यालयीन अधीक्षक हे सहाय्यक वॉर्डस्तरीय नोडल ऑफिसर म्हणून या कामासाठी कार्यरत आहेत.

२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी ठाणे पालिका मुख्यालय आणि प्रभाग समिती कार्यालयातील झेंडावंदनचा सोहळा आटोपताच अधिकारी-कर्मचारी सर्वेक्षण कामाला लागले. शनिवार व रविवारीही हे काम सुरूच होते. सुरुवातीच्या काळात सर्वेक्षणाच्या ॲपमध्ये वारंवार बिघाड होत असल्याने सर्वेक्षणात अडचणी येत असल्याचे प्रगणकांकडून सांगितले जाते होते. मात्र आता सुलभरित्या हे काम सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. आतापर्यंत दोन लाख घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून येत्या काळात अधिक वेगाने हे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य पालिका प्रशासनाने ठेवल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले.

मुंब्र्यात काही प्रमाणात अडचणी

मुंब्र्यात सुरू असलेल्या या सर्वेक्षणात काही प्रमाणात नागरिकांकडून अडथळा निर्माण केला जात आहे. प्रगणकांना माहिती देताना वाद घालणे, अरेरावीची भाषा करणे, त्यांना धमक्या देणे असेही प्रकार घडत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.


पालिका आयुक्तांचे आवाहन

ठाणे पालिकेमार्फत नियुक्त केलेले पर्यवेक्षक व प्रगणकांना सर्वेक्षणाच्या कामकाजात सहकार्य करण्याचे आवाहन पालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी केले आहे. पालिकेच्या माध्यमातून आयुक्त बांगर यांचे आवाहनपत्र विविध गृहसंकुलांना पाठवले जात असल्याने या सर्वेक्षणामध्ये सुसूत्रता येत आहे.

३१ जानेवारीचे आव्हान

येत्या तीन दिवसांत अर्थात ३१ जानेवारीपर्यंत सर्वेक्षण पूर्ण करण्याचे आव्हान पालिका कर्मचाऱ्यांसमोर आहे. गेले तीन दिवस जोडून सुट्ट्या असल्याने दैनंदिन कामकाजाचा ताण प्रशासनावर नव्हता, मात्र आता हे काम पूर्ण करताना पालिका कर्मचाऱ्यांची दुहेरी कसरत होणार आहे.

# कल्याणमध्ये नपुंसक पती विरुद्ध पत्नीची पोलीस ठाण्यात तक्रार




■कल्याण। प्रतिनिधी,

आपण नपुंसक आहोत हे माहिती असूनही पतीने ही माहिती आपणास विवाहापूर्वी दिली नाही. आपल्याशी विवाह करून आपणास शरीर सुखापासून वंचित ठेवले, अशी तक्रार एका विवाहितीने कल्याण मधील आपल्या पती विरुद्ध खडकपाडा पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. ३२ वर्षाची विवाहिता असलेली तक्रारदार महिला शहापूर परिसरातील दुर्गम भागात राहणारी आहे. नातेवाईकांच्या ओळखीतून या महिलेचा विवाह कल्याण मधील शहाड येथील एका ४० वर्षाच्या तरूणा बरोबर गेल्या वर्षी जून मध्ये झाला होता. विवाहापूर्वी विवाहितेच्या नातेवाईकांनी तुम्ही विवाहासाठी ४० वर्ष होऊन सुध्दा का थांबले असे विचारले तेव्हा त्यावेळी आरोपी पतीने आपण सरकारी नोकरी मिळवण्याच्या प्रयत्नात होतो म्हणून आपणास विवाहास विलंब झाला, असे कारण दिले होते.

विवाहितीने मुलगा शिकलेला आहे म्हणून त्याला पसंत केले. मुलाने मुलीला पसंत केले. या दोघांचा विवाह मोठ्या थाटात नाशिक जवळील इगतपुरी भागात पार पडला होता. विवाहानंतर पती विक्षिप्तपणे वागत असल्याचे तक्रारदार विवाहितेला आढळले. तिने पतीला भावनिक नात्याद्दल समजून सांगितले. परंतु पतीमध्ये काही दोष आहेत हे तक्रारदार विवाहितेला निदर्शनास आले. ती सुरूवातीला अस्वस्थ होती. या अस्वस्थेतमधून विवाहिता माहेरी निघून गेली.

परंतू पती, सासरच्या मंडळींच्या आग्रहामुळे ती परत माहेरी आली. तिला पतीमधील भावनिक दोष प्रकर्षाने दिसून आले. घरात असताना पतीच्या पिशवीत तो डॉक्टरांकडून काही औषधे घेत असल्याचे आढळले. तिने गुपचूप संबंधित डॉक्टरकडे जाऊन विचारणा केली. त्यावेळी डॉक्टरने पती मध्ये काही भावनिक दोष आहेत. त्यासाठी ते हे औषधे घेत असल्याचे सांगितले. पतीकडून आपणास कधीही शरीरसुख मिळणार नाही याची खात्री पटल्यावर विवाहितीने पतीने आपली नपुसंक आहोत हे माहिती असुनही विश्वासघात, फसवणूक केली आहे, अशी तक्रार खडकपाडा पोलीस ठाण्यात केली आहे. महिला साहाय्यक पोलीस निरीक्षक ए. एन. घस्ते प्रकरणाचा तपास करत आहेत.

# उल्हासनगरात भाजपाच्या मागणीला कॉँग्रेसचा पाठिंबा; आयुक्तांना दिले निवेदन



■उल्हासनगर। प्रतिनिधी,

भाजपने पत्रकार परिषद घेऊन १०० कोटीचा टेंडर घोटाळा आरोप करून झापी अँड कंपनीला ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी महापालिका आयुक्तांना केली होती. कॉँग्रेसने यामध्ये उडी घेत भाजपच्या मागणीला पाठिंबा असल्याचे निवेदन आयुक्त अजीज शेख यांना देऊन पारदर्शकपणे चौकशी करून कारवाईची मागणी केली. उल्हासनगर महापालिका टेंडर घोटाळ्या बाबत गेल्या आठवड्यात भाजपचे शहरजिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी, आमदार कुमार आयलानी यांनी पत्रकार परिषद घेऊन १०० कोटीच्या घोटाळ्याचे आरोप केले. याबाबत शिवसेना शिंदे गटाचे कल्याण उपजिल्हाप्रमुख अरुण अशांन यांच्यावर गंभीर आरोप करून झापी अँड कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली. त्यानंतर अरुण अशान व झापी अँड कंपनीच्या प्रमुखांनीही पत्रकार परिषद घेऊन भाजपच्या शहरजिल्हाध्यक्षवर आरोप केले. दरम्यान यांच्यात समझोता झाल्याची चर्चाही रंगली होती. मात्र कॉँग्रेस पक्षाचे शहरजिल्हाध्यक्ष रोहित साळवे यांनी सोमवारी दुपारी आयुक्त अजीज शेख यांची भेट घेऊन, भाजपच्या मागणीला पाठिंबा असल्याचे निवेदन दिले. ज्या ठेकेदारावर घोटाळ्याचे आरोप झाले. त्याला महापालिकेने कोट्यवधींच्या निधींतील विकास कामाचे ठेके दिले असून निकृष्ट कामाबाबत यापूर्वी आरोप झाल्याचे साळवे यांचे म्हणणे आहे.

भाजपने केलेल्या सर्व आरोपांवर कारवाई व खुलासा करून जनते समोर आणून महापालिकेची विश्वासहर्ता कायम ठेवावी. अशी मागणी साळवे यांनी महापालिका आयुक्तांना केली. येत्या पंधरा दिवसात या संदर्भात काहीही कारवाई न झाल्यास कॉँग्रेस पक्षातर्फे आंदोलन घेण्यात येईल. असा इशाराही साळवे यांनी दिला आहे. प्रदीप रामचंदानी हे बांधकाममंत्री रविंद्र चव्हाण यांचे निकटवर्तीय असून अरुण अशान हे मुख्यमंत्री व खासदार यांचे निकटवर्तीय आहेत. दोघांच्याही आरोपाची चौकशी महापालिका आयुक्तांनी केल्यास, मोठा घोटाळा उघड होण्याची शक्यता साळवे यांनी व्यक्त केली. कॉँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळात नाणिक अहुजा, किशोर धडके, कामगार नेता आशाराम टाक आदीजन उपस्थित होते.

शहरात शिवसेना शिंदे गट व भाजपात टेंडरवारवरून आरोप-प्रत्यारोप रंगले आहे. याबाबत अधिक वाद निर्माण होऊ नये म्हणून आयुक्त अजीज शेख यांनी शहर अभियंता संदीप जाधव यांना पत्रकारांना प्रतिक्रिया देण्याची तंबी दिली. याबाबत अधिकृतपणे आयुक्त प्रतिक्रिया देणार असल्याची माहिती शहर अभियंता जाधव यांनी दिली आहे.

# पनवेल पालिकेविरोधात प्रकल्पग्रस्तांचे मंगळवारपासून धरणे आंदोलन

■पनवेल। प्रतिनिधी,

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामधील प्रकल्पग्रस्त मालमत्ता धारकांनी पुन्हा एकदा आंदोलनाचा आक्रमक पवित्रा घेऊन मंगळवारपासून पालिका प्रशासकीय इमारतीसमोर महाधरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजारातील व्यापाऱ्यांना ३०० कोटी रुपयांच्या एलबीटी माफ करण्याची भूमिका घेतल्याने सरकारने पालिका क्षेत्रातील प्रकल्पग्रस्त मालमत्ता धारकांकडून पालिका स्थापनेपासून पहिली पाच वर्षे करमाफ करावा तसेच त्यानंतरची ३५ वर्षे ग्रामपंचायत दराने कर वसूल करावा अशी मागणी पनवेल तालुका प्रकल्पग्रस्त समितीने केली आहे. ऑक्टोबर २०१६ मध्ये पूर्वाश्रमीची पनवेल नगरपरिषदेचा विस्तार करत २३ ग्रामपंचायतींमधील २९ गावांचा परिसर आणि नगरपरिषदेचा परिसराची महापालिका स्थापन केली. महापालिका स्थापनेपासून मालमत्ता कराच्या दर आणि वसूलीबाबत प्रकल्पग्रस्त आणि सिडको वसाहतींमधील मालमत्ताधारकांकडून विरोध होत आहे.

न्यायालयात याबाबत याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. अद्याप न्यायालयातून कोणताही



दिलासा पनवेलवासियांना मिळालेला नाही. तसेच राज्यकर्त्यांकडून सुद्धा घोषणा वगळता कोणताही दिलासा पनवेलकरांना मिळालेला नाही.

यापूर्वी प्रकल्पग्रस्तांनी एकत्र येऊन पालिका प्रशासकीय इमारतीसमोर आंदोलन केले होते. आश्वासनाखेरीज प्रकल्पग्रस्तांना ठोस निर्णय पालिका प्रशासकांकडून मिळू शकला नाही. या दरम्यान पुन्हा पनवेल प्रकल्पग्रस्त समितीने मंगळवारपासून आंदोलनाची हाक दिली आहे. पूर्वाश्रमीच्या ग्रामपंचायत काळासारख्या सुविधा सध्या महापालिकेकडून मिळत असल्याचे प्रसिद्धी पत्रकाव्दारे प्रकल्पग्रस्त समितीने दावा केला आहे. तसेच सध्या पालिकेने लावलेला कर अवाजवी असल्याचे म्हटले आहे.

# बेपत्ता मुलाचा मृतदेह आढळला

■ठाणे। प्रतिनिधी,

भिवंडी येथील क्वार्टरगेट भागात रविवारी चार वर्षीय मुलाचा मृतदेह चाळीतील पाण्याच्या टाकीमध्ये आढळल्याने खळबळ उडाली. शुक्रवारी दुपारपासून तो बेपत्ता होता. टाकीमध्ये बुडून त्याचा मृत्यू झाला असावा असा अंदाज पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे.

क्वार्टरगेट भागातील एका चाळीमध्ये विकीन्याश चव्हाण (४) हा त्याच्या कुटुंबासोबत राहात होता. शुक्रवारी दुपारी तो त्याच्या आजीसोबत बाहेर निघाला होता. आजी काही अंतरपुढे गेल्या. त्यांनी मागे पाहिले असता, त्यांना विकीन्याश आढळून आला नाही. याप्रकरणी भिवंडी शहर पोलीस ठाण्यात तो बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. या घटनेचे गांभीर्य लक्षात



घेऊन उपायुक्त नवनाथ ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकांकडून त्याचा शोध सुरू होता.

पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही तपासले. खबऱ्यांकडून माहिती घेतली. परंतु त्याचा शोध लागत नव्हता. रविवारी दुपारी त्याचा मृतदेह चाळीतील पाण्याच्या टाकीमध्ये तरंगताना आढळून आला. त्याच्या शरिरावर कोणतेही व्रण आढळून आले नाहीत. तो पाण्याच्या टाकीजवळ गेला असावा आणि त्यात त्याचा मृत्यू झाला असावा असा अंदाज पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे.

# शिवीगाळ केल्याच्या रागातून त्रिकुटाने केला मित्राचा खून; एका अल्पवयीनला पोलिसांनी घेतले ताब्यात

■ठाणे। प्रतिनिधी,

केवळ शिवीगाळ केल्याच्या रागातून तानाजी विठ्ठल शिंदे (२८, रा. जिजामातानगर, वागळे इस्टेट, ठाणे) या मित्राचा खून करणाऱ्या त्रिकुटापैकी एका १६ वर्षीय हल्लेखोराला ताब्यात घेतल्याची माहिती वागळे इस्टेट पोलिसांनी सोमवारी दिली.

यातील अन्य दोन हल्लेखोरांचा शोध घेण्यात येत असल्याचेही पोलिसांनी सांगितले. तानाजी हा वागळे इस्टेट रोड क्रमांक ३३ परिसरात वास्तव्याला होता. २८ जानेवारी रोजी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास पाचपाखाडी येथे जावून येतो, असे भाऊ ज्ञानेश्वर शिंदे (३४) यांना सांगून तो घराबाहेर पडला.



त्यानंतर २९ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास वागळे इस्टेट, रामचंद्रनगर प्रतिक सोसायटीच्या पाठीमागील रस्त्यावर डोक्यावर मारहाणीच्या खुना आणि रक्तबंबाळ अवस्थेत त्याचा मृतदेह आढळला. त्याच्या डोक्यावर प्रहार करुन त्याचा खून केल्याचे पोलिसांच्या तपासात आढळले. याप्रकरणी खूनाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रविण माने यांच्या पथकाने खबऱ्यांच्या मदतीने तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे हल्लेखोरांपैकी एका १६ वर्षीय मुलाला ताब्यात घेतले. तेंव्हा तानाजी याने दारुच्या नशेतच शिवीगाळ केल्याने वचपा काढण्यासाठी त्याच्या डोक्यावर २९ जानेवारी रोजी पहाटे ५.३० ते ६ वाजण्याच्या सुमारास लाकडी दांडक्याने अन्य दोन साथीदारांच्या मदतीने प्रहार केल्याची कबूली या मुलाने दिली. यात तो गंभीर जखमी झाल्यानंतर त्याचा मृत्यू झाला. हल्ला करणाऱ्या अन्य दोन साथीदारांचाही शोध घेण्यात येत असल्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड यांनी सांगितले.

